# जवाहरलाल नेहरूंचे काश्मीरबाबतचे धोरण

**कु· रोहिणी संभाजी चव्हाण,** संशोधक विद्यार्थिनी, राज्यशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

chavanrohini36@gmail.com Mo -9172884732

---

**प्रस्तावना**

जवाहरलाल नेहरूंच्या मनात काश्मीरविषयी विशेष प्रेम होते, ही गोष्ट सर्वज्ञात आहे. ते स्वतः काश्मिरी होते. अठराव्या शतकाच्या प्रारंभी राज कौल नावाचे त्यांचे एक पूर्वज आपले नशीब काढण्यासाठी दिल्लीत आले. आपले काश्मिरीपण एवढेच नेहरूंच्या काश्मीरविषयीच्या आस्थेचे कारण नव्हते. काश्मीरच्या निसर्गाचेही नेहरूंना जबरदस्त आकर्षण होते. १९१६ साली जवाहरलालांचा विवाह झाल्यानंतर सगळे नेहरू कुटुंब उन्हाळा घालवण्यासाठी काश्मीरमध्ये गेले होते. याच मुक्कामात जवाहरलालांना बर्फावरची साहसी सहल करण्याची ऊर्मी आली. आपल्या एका चुलतभावासह त्यांनी ती सहल केली. लदाख आणि काश्मीरमध्ये पुन्हा यावयाचे बेत त्यांनी अनेकवेळा केले, पण दिल्लीतल्या कर्तव्यांनी या इच्छेवर नेहमीच मात केली. काश्मीर भारतातच राहिले पाहिजे यासाठी नेहरू धडपड करत याचे तिसरे कारण होते. काश्मीर संस्थानचे संरक्षणदृष्ट्या महत्त्वाचे भौगोलिक स्थान. पाकिस्तान, अफगाणिस्तान, तिबेट, चीन यांच्या सीमारेषा लागून असणे आणि सोव्हिएत संघराज्याची सीमाही जवळच असणे ही गोष्ट पंतप्रधान झालेल्या आणि परराष्ट्र खात्याचीही जबाबदारी सांभाळणाऱ्या नेहरूंना महत्त्वाची वाटणे स्वाभाविक होते. म्हणूनच काही राजकारणी जम्मू व लदाखबद्दलच आग्रह धरीत असले तरी नेहरूंचा आग्रह मात्र काश्मीर खोरेसुद्धा भारतात आले पाहिजे, असा होता. जनतेचा अन्यायाविरुद्धचा लढा नेहरूंना नेहमीच आकर्षित करी. तेथे आपण धावून जावे, अशी त्यांना इच्छा होई. काश्मीरमध्ये महाराजांच्या शासनाच्या अन्यायाविरुद्ध लोक लढत होते. तो लढासुद्धा नेहरूंच्या आस्थेचा विषय झाला.

**पंडित जवाहरलाल नेहरूंची भूमिका**

जवाहरलाल नेहरूंचे काश्मीरबाबतचे धोरण वास्तवाचा विचार करूनच आखलेले होते. धार्मिक बहुलतेच्या आधाराने भारत आणि पाकिस्तान यांची फाळणी झाली होती. संस्थानेसुद्धा भौगोलिक सलगता आणि लोकसंख्येमधील धार्मिक बहुलता यांच्या आधारावरच मुख्यतः भारत किंवा पाकिस्तानात सामील झाली होती. काश्मीर हे मुस्लिम बहुसंख्या असलेले संस्थान असल्यामुळे व ते पाकिस्तानलाही भौगोलिकदृष्ट्या सलग असल्यामुळे पाकिस्तानात सामील होणे तर्कशास्त्राला धरून होते; परंतु भारताच्या संरक्षणाच्या दृष्टीने महत्त्वाचे असलेले काश्मीरचे स्थान लक्षात घेऊन काश्मीर सहजासहजी पाकिस्तानात जाऊ देण्याची भारतीय नेतृत्वाची, विशेषतः जवाहरलाल नेहरूंची तयारी नव्हती. त्याचे आणखी एक महत्त्वाचे कारण होते. स्वातंत्र्यलढ्याच्या काळातच काँग्रेसने हिंदू आणि मुस्लिम ही दोन वेगळी राष्ट्रे आहेत, हा द्विराष्ट्रसिद्धांत अमान्य केला होता. काश्मीर भारतात राहिले तर मुस्लिम बहुलभागसुद्धा भारतात आनंदाने नांदतो आहे, असे चित्र निर्माण होईल आणि एका परीने काँग्रेसच्या धर्मनिरपेक्ष भूमिकेला बळकटी येईल, हेही कारण काश्मीरबद्दल आग्रह धरण्यामागे होते. हीच भूमिका नेहरूप्रमाणे महात्मा गांधींचीही होती.

स्वातंत्र्यापूर्वी सुमारे दहा वर्षे नेहरूंची आणि शेख अब्दुल्लांची ओळख झाली होती. काश्मीर भारतात राहायचे असेल तर तेथील बहुसंख्य मुस्लिम जनतेचा पाठिंबा भारताला असला पाहिजे. याची नेहरूंना जाणीव होती. काश्मीरचे राजकारण हिंदू राजा विरुद्ध मुस्लिम प्रजा या वास्तवामुळे केव्हाही त्याला जातीय रूप येऊ शकेल, याचीही त्यांना कल्पना होती. म्हणून काश्मीरच्या जनतेचा राजाविरुद्धचा लढा हा धर्मनिरपेक्ष राहिला पाहिजे, असा नेहरूंचा आणि गांधीजींचाही आग्रह होता. काश्मीरमधील लोकलढ्याचा मुस्लिम नेता धर्मनिरपेक्ष भूमिका मान्य असणारा आणि भारताशी जवळीक साधू इच्छिणारा असावा अशी नेहरूंची इच्छा असणे स्वाभाविक होते. सामीलनाम्यानंतर शेख अब्दुल्लांची तुरुंगातून सुटका करा आणि त्यांना राज्यकारभाराचीसूत्रे द्या, असा आग्रह नेहरूंच्या सांगण्यावरून भारत सरकारने महाराजा हरिसिंहांकडे धरला होता. Pn 64

महाराजा हरिसिंहांनी २६ ऑक्टोबर १९४७ रोजी या सामीलनाम्यावर सही केली. सामीलनामा स्वीकारल्याचे निदर्शक म्हणून माउंटबॅटन यांची सही त्याच दिवशीची आहे. सामीलनामा हातात आल्यावर काश्मीरच्या संरक्षणासाठी सैन्य पाठवण्याचा निर्णय संरक्षण उपसमितीने ताबडतोब घेतला.सेनाधिकाऱ्यांशी झालेल्या चर्चेत भारताचे तत्कालीन तिन्ही सेनाधिकारी सैन्य पाठवण्याच्या निर्णयाला मनापासून पाठिंबा देत नव्हते आणि परिणामाबद्दल शंका व्यक्त करत होते. स्वतः माउंटबॅटनही सैन्य पाठवण्याला फारसे अनुकूल नव्हते. जवाहरलाल नेहरूंनी त्यांचे म्हणणे अमान्य केले आणि सैन्य

पाठवण्याचा आग्रह धरला. काश्मीरमध्ये सैन्य पाठवणे हीसुद्धा भारत सरकारसाठी एक कसोटीच होती.सुमारे शंभर विमानांनी भारतीय सैनिकांना श्रीनगर विमानतळावर पोहोचवले.

१९२७ साली नेहरू युरोपातून परत आले आणि त्यांनी मद्रास येथे भरलेल्या काँग्रेस अधिवेशनात जोरदार प्रचार करून संपूर्ण स्वातंत्र्याला पाठिंबा देणारा ठराव मान्य करून घेतला होता. भारताला संपूर्ण स्वातंत्र्य मागण्याची वेळ अजून आली नाही, सध्या आपण वसाहतीच्या स्वराज्याची (Dominion Status) मागणी करावी, असे गांधीजींचे मत होते. गांधीजींनी नेहरूंना 'तू फार वेगाने जातो आहेस', असा इशारा देणारे पत्रही पाठवले होते. पण तरुण आणि बंडखोर नेहरूंना ते पटलेले नव्हते. त्यानंतर दोन वर्षांनी त्यांनी लाहोर अधिवेशनात संपूर्ण स्वातंत्र्याची पुन्हा मागणी केली. १९२८मध्येच भारताची भावी घटना कशी असावी याचा ढोबळ मसुदा तयार करण्यासाठी काँग्रेसने मोतीलाल नेहरूंच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली होती. जवाहरलाल तिचे सभासद नव्हते. पण आपल्या वडिलांना या कामात पडेल ती मदत करत होते. या समितीने आपल्या अहवालात संकल्पित राज्यघटनेत भारत हा स्वायत्त वसाहतीचा दर्जा असलेला देश असेल असे गृहीत धरले होते.

१९३० च्या सुमाराला भारताला सध्या वसाहतीचे स्वराज्य द्या, असे म्हणणे म्हणजे पूर्ण स्वातंत्र्याला लांबणीवर टाकणे होते. ब्रिटिश सत्तेची पकड घट्ट होती. एकदाच स्वातंत्र्य मिळवू म्हणजे पुन्हा अर्धवट अधिकारात जास्त दिवस राहणे नको, असा जवाहरलालप्रभृतींचा विचार असे. वसाहतीचे स्वराज्य किती दिवस राहील व पुन्हा स्वातंत्र्यासाठी लढा करावा लागेल का अशा शंका त्या वेळी भारतीय नेत्यांना वाटत असत.

भारताच्या नकाशात साधारण सिंहाच्या मुखासारखे दिसणारे पश्चिम किनाऱ्यावरचे काठियावाड अनेक छोट्यामोठ्या संस्थानांनी व्यापले होते. शांततेत जगणारी ही संस्थाने होती. त्याला अपवाद ठरणार होते पश्चिम किनाऱ्यावरचे जुनागड. याच जुनागडमध्ये गीरचे सिंहअसलेले आशियातले एकमेव अरण्य आहे आणि सोरटी सोमनाथाचे मंदिरही आहे. नवाब शेकडो कुत्री पाळण्याच्या नादात व्यग्र असे आणि कारभार त्याने दिवाणावर सोपवलेला असे.

जुनागडची हद्द पाकिस्तानला लागून नव्हती. एका बाजूला समुद्र वगळला तर इतर सर्व बाजूंनी भारतच होता. कराची तर तेथून चारशे किलोमीटर अंतरावर होते.फक्त संस्थानिकाचा सामीलनामा हाच जर अंतिम समजावयाचा असेल तर जुनागड जनतेच्या इच्छेविरुद्ध पाकिस्तानात जाणार होते. १२ सप्टेंबर १९४७ रोजी जवाहरलाल नेहरूंनी लियाकतअली खानांना तार पाठवून कळवले की, जुनागडच्या जनतेची इच्छा जर अजमावली गेली, तर ज्या संघराज्यात सामील व्हावयाचा निर्णय ती घेईल तो निर्णय भारत मान्य करील. जेथे संस्थानिक आणि बहुसंख्य प्रजा वेगवेगळ्या धर्माची असेल तेथे लोकेच्छा प्रमाण मानावी व ती सार्वमताने जाणून घ्यावी, हा एक न्याय्य तोडगा होता. जुनागडची बहुसंख्य जनता हिंदू होती व त्यांना पाकिस्तानात अजिबात जावयाचे नव्हते. त्यामुळे सार्वमताची सूचना व त्याच्या निर्णयाला मानण्याची तयारी हा त्या हिंदू जनतेला भारतात ठेवण्याचा एक उपाय होता.

नेहरूंची तार पोहोचल्यानंतर पाकिस्तानने १३ सप्टेंबर रोजी उत्तर दिले की, जुनागडने पाकिस्तानला सामीलनामा पूर्वीच लिहून दिला आहे आणि तो आम्ही मान्य केला आहे. जुनागडला लागून मांगरोळ हे एक छोटे संस्थान व बाबरियावाड, मानावदार अशा जहागिरी होत्या. मांगरोळच्या शेखने भारताला सामीलनामा लिहून दिला होता व बाबरियावाड आणि इतर जहागिरीनी तसेच भारताला कळवले होते. मांगरोळ, मानावदार आणि बाबरियावाड ही जहागीरवजा छोटी संस्थाने काही बाबतीत जुनागडचे अधिकारक्षेत्र मानत असली तरी ती तत्त्वतः स्वतंत्र होती. जुनागडच्या नवाबांनी बाबरियावाडला काही सैनिक पाठवले व त्यावर आपला अधिकार पुनःस्थापित करण्याचा प्रयत्न केला. हे त्यांचे कृत्य बेकायदेशीर होते. भारत सरकार आता सैनिकी कारवाईचा विचार करू लागले होते. वल्लभभाईंनी तिकडे सैन्य पाठवले पाहिजे, असे मत मांडले. सैन्य पाठवण्याला माउंटबॅटन यांचा विरोध होता. शेवटी नेहरूंनी मुंबईतील काही सैन्य तुकड्या पोरबंदरला आणून ठेवण्याचे ठरवले.

संरक्षणविषयक महत्त्वाचे निर्णय घेण्यासाठी असलेल्या संरक्षण समितीत पंतप्रधान जवाहरलाल नेहरू, उपपंतप्रधान आणि गृहमंत्री वल्लभभाई पटेल यांच्या व्यतिरिक्त गव्हर्नर जनरल माउंटबॅटन यांचाही समावेश होता; शिवाय तिन्ही सेनादलांच्या प्रमुखांनाही बैठकांना बोलावण्यात येत असे.

काश्मीरमध्ये सैन्य पाठवल्यानंतर आठवड्याभराच्या आत २ नोव्हेंबर १९४७ रोजी आकाशवाणीवरून भाषण करताना नेहरूंनी पाकिस्तानी आक्रमकांनी काश्मीरमध्ये केलेल्या अत्याचाराची माहिती सांगितली. याच भाषणात त्यांनी सांगितले की, 'जेथे संस्थानाच्या विलीनीकरणाबद्दल वाद असेल तेथे लोकांची इच्छा हीच प्रमाण मानणे आमच्या धोरणाचा भाग आहे. म्हणूनच आम्ही काश्मीरच्या जनतेला तसे (लोकांची इच्छा प्रमाण मानली जाईल) आश्वासन दिले आहे.' याच

प्रकारची तरतूद भारतीय स्वातंत्र्याच्या कायद्यातही होती. याच भाषणात ते असेही म्हणाले की, 'आम्ही जर काश्मीरमध्ये सैन्य पाठवले नसते तर तलवारीच्या राजवटीला, जंगलच्या कायद्याला शरण जावे लागले असते आणि तसे होऊ देणे हा लोकांनी आमच्यावर टाकलेल्या विश्वासाचा घात झाला असता.

काश्मीरवर आक्रमण करणारांत पाकिस्तानचे सैनिक व अधिकारी होते व त्यांना परतवून लावण्यासाठी भारताची सेना लढत होती. नेहरूंची काश्मीरमधील आक्रमण पूर्ण हटवल्याशिवाय संयुक्त राष्ट्रसंघात जायचे नाही, हीच भूमिका कायम होती.

**सुरक्षा परिषदेने केलेला ठराव**

२० डिसेंबर १९४७ रोजी भारतीय मंत्रिमंडळाची बैठक झाली. त्या बैठकीत संयुक्त राष्ट्रसंघाकडे जाण्याची सूचना मान्य झाली. नेहरूंनी या सूचनेला विरोध केला. संयुक्त राष्ट्रसंघात तक्रार करून आपण स्वस्थ बसायचे असा हेतू नव्हता. भारतीय सैन्याने आक्रमकांना हाकलून देण्याचे काम चालूच ठेवावयाचे असे नेहरूंचे धोरण होते. मंत्रिमंडळात २० तारखेला निर्णय झाल्याबरोबर नेहरूंनी दुसऱ्याच दिवशी काश्मीरचे महाराज हरिसिंह यांना पत्र पाठवले आणि या निर्णयाची माहिती दिली. आपल्या पत्रात नेहरूंनी एक खुलासा केलेला आहे आणि तो फार महत्त्वाचा आहे.

'आमचा उद्देश एक मर्यादित तक्रार संयुक्त राष्ट्रसंघाकडे दाखल करावी, परंतु त्यामुळे आम्ही स्वतःला कोणत्याही रीतीने बांधून घेऊ नये असा आहे. (तक्रार प्रलंबित असताना) आम्ही आक्रमकांशी लढत राहू आणि त्यांना पिटाळून लावण्याचा प्रयत्नही करू. राष्ट्रसंघाकडील प्रकरण या आमच्या कामाला कोणत्याही तहेचा प्रतिबंध करणार नाही. अर्थात असे प्रकरण दाखल झाल्यावर आणखी काही घडामोडी होतील, त्यासाठी आपण तयार असले पाहिजे. पाहिजे.

सुरक्षा परिषदेने, 'भारत आणि पाकिस्तान यांनी काश्मीरमधील सध्याच्या परिस्थितीत मोठा बदल होईल असे काही करू नये आणि तसा बदल झाल्यास सुरक्षा परिषदेला कळवावे,' असा शिफारसवजा ठराव केला होता. नंतर २१ एप्रिल १९४८ रोजी सुरक्षा परिषदेने आणखी एक ठराव केला व काश्मीरला भेट देऊन शिफारशी करण्यासाठी एक आयोग नेमला.

१३ ऑगस्ट १९४८ रोजी या आयोगाने एक महत्त्वाचा ठराव केला व त्यात शस्त्रसंधी, शौततेचा करार आणि सार्वमत या तिन्हींबद्दल तरतूद होती. काश्मीर संस्थानच्या प्रत्यक्ष ताबा ठेवून राज्यकारभार करण्याच्या अधिकाराला आयोगाने मान्यता दिली होती आणि पाकिस्तानचे सैनिक आणि इतर आक्रमक संस्थानातून काढून टाकले जावेत, भारताने नंतरच्या शांततेचीजबाबदारी घ्यावी, त्यासाठी किमान आवश्यक सैन्य भारताने तेथे ठेवावे व त्यानंतर काश्मीरच्या जनतेचे मत कसे जाणून घ्यावे, याचा आयोग विचार करील असे म्हटले होते. ११ डिसेंबर १९४८ रोजी केलेल्या पुरवणी ठरावात शस्त्रसंधीसाठी उचलावयाच्या पावलांचा निर्देश होता. हा ठराव भारत आणि पाकिस्तान या दोघांनीही मान्य केला.

(१) शस्त्रसंधी करण्यात यावी.

२) पाकिस्तानने आपले सैन्य, सर्व आक्रमक टोळीवाले आणि पाकिस्तानी नागरिक यांना जम्मू- काश्मीरमधून परत घेण्याची जबाबदारी पार पाडावी, भारतानेही आपली सेना परत घ्यावी, मात्र भारताने संस्थानात शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी आवश्यक असणारे पुरेसे सैन्य तेथे ठेवावे. पाकिस्तानने ताब्यात घेतलेला मुलूख सोडून दिल्यानंतर तेथे तात्पुरती व्यवस्था म्हणून स्थानिक लोक आयोगाच्या मार्गदर्शनानुसार कारभार करतील.

३) पहिल्या भागातील तरतुदीप्रमाणे (शस्त्रसंधी झाल्यावर) व दुसरा भाग अंमलात आल्यावर (पाकिस्तानचे सैन्य व आक्रमक परत गेल्यानंतर) कोणत्या मागनि व कशा पद्धतीने संस्थानातील जनतेचे मत जाणून घ्यावे, याचा आयोग विचार करील.

या ठरावात काश्मीरमध्ये पाकिस्तानचे सैन्य घुसले आहे, हे तर नमूद केलेच होते; शिवाय काश्मीरमध्ये शांतता रक्षणाची जबाबदारी भारताची आहे व त्यासाठी आवश्यक तेवढे किमान सैन्य भारताने तेथे ठेवावे, हेही सांगण्यात आले होते. भारताच्या तेथील अस्तित्वाच्या कायदेशीरपणाला आणि सार्वभौमत्वाला ती एक प्रकारची मान्यताच होती. हा ठराव झाल्यानंतरही त्यावर ताबडतोब अंमजलबजावणी झाली नाही. काश्मीरमधील आपली सेना आणि टोळीवाले परत बोलावण्यास पाकिस्तानचे नेतृत्व तयार होत नव्हते.

**संदर्भ ग्रंथ:**

नरेन्द्र चपळगावकर, 'पंतप्रधान नेहरू', मौज प्रकाशन पहिली आवृत्ती जुलै २०२२
सुरेश भटेवरा, शोध...... नेहरू-गांधी पर्वाचा, मनोविकास प्रकाशन,नारायण पेठ,
पुणे, द्वितीय आवृत्ती १ नोव्हेंबर २०२१